महाराष्ट्र शासन

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कोल्हापूर

कोल्हापूर दु.क्र. 0231-2651318 E-mail:-acswokolhapur@gmail.com

जा.क्र.सआसकको/ स्वाधार/ प्रवेश सॉफ्टवेअर/ कार्यप्रणाली/ 4902 /2024 दि. 10/09/2024.

प्रति,

मा.कुलगुरु/ अधिष्टाता/ प्राचार्य/ मुख्याध्यापक,

---------------------------------------------

---------------------------------------------

महाविद्यालय/ शैक्षणिक संस्था, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**विषय : शासकीय वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना शैक्षणिक वर्ष सन 2024-2025 करीता अर्ज सादर करणेबाबत.**

संदर्भ : 1. इकडील पत्र क्र. 3143 दि. 19/7/2024 नूसार दिलेले प्रसिध्दीपत्रक.
2. दि. 22 जून, 2024 रोजी व्हॉटसअॅप द्वारे पुरविण्यात आलेले मा. समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रवेशाबाबत परिपत्रक.
3. इकडील पत्र क्र. सआसकको/ भासशि/ स्वाधार/ 2024-25/ 3296 दि. 1/8/2024.
4. दि. 28 ऑगस्ट, 2024 रोजी व्हॉटसअॅप संदेश
5. मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. 2875 दि. 6/9/2024.

उपरोक्त विषयाने व संदर्भाने कळविण्यात येते की, या कार्यालया मार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविली जाते. सदर योजने अंतर्गत विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असावा अशी अट नमूद आहे. याबाबत शासकीय वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना या शैक्षणिक वर्ष सन 2024-25 संगणक प्रणाली आद्यावलीद्वारे सुरु करण्यात आली आहे.

या कार्यालया मार्फत **स्वाधार योजना कोल्हापूर** हा व्हॉटसअप ग्रूप कार्यान्वित असून विषयांकीत योजनांची कार्यवाही करणेबाबत वेळोवेळी यापूर्वी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन 2024-25 करीता प्रथम वर्षा करीता (उदा. 11 वी, प्रथम वर्ष पदवी, पदविका, इंजिनियरींग करीता द्वितीय वर्षात थेट प्रवेशित इ.) प्रवेश घेणारे विद्यार्थी यांचे अर्ज hmas.mahaait.org या वेबसाईड वर भरण्यात यावे. सदर भरलेल्या अर्जाची प्रत नियमित अर्जासोबत जोडून विहीत कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाबाबतचे आपले स्तरावरील सर्व अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(सचिन साळे)
**सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण, कोल्हापूर**

प्रत : मा. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे माहितीस्तव सविनय सादर.

# महाराष्ट्र शासन

## सहायक आयुक्त, समाज कल्याण कोल्हापूर

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारेमाळ कोल्हापूर**

कोल्हापूर ०२३१-२६५१३१८ E-mail :- acswokolhapur@gmail.com


जा.क्र.सआसकको/भासशि/स्वाधार /२०२४-२५/३२९६ दिनांक- १/८/२०२४.

प्रति,
प्राचार्य/ मुख्याध्यापक/ कुलगुरु/ अधिष्टाता,
-------------------------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------
महाविदयालय/ शैक्षणिक संस्था,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**विषय :- सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना प्रक्रियेच्या कार्यपध्दती बाबत.**

संदर्भ : १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीसीएच २०१६/ प्र.क्र.२९३/ शिक्षण२ दि. १३/०६/२०१८.
२. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. सकआ/ शिक्षण/ शावगृ/ प्रवेश व स्वाधार/ ऑनलाईन प्रणाली/ २०२४-२५/ का-५अ/ २४९४ दि. ३१/०७/२०२४.

उपरोक्त विषयाने व संदर्भाने कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानूसार खालील अटी व शर्तिनूसार राबविण्यात येते.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष खालीलप्रमाणे -**

१. विहीत नमून्यातील अर्ज
२. विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असावा.
३. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
४. शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमास विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा.
५. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौध्द या प्रवर्गाचा असावा.
६. विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
७. या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेल्या व प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्याचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल.
८. विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक त्यांने ज्या राष्ट्रीयकृत / शेडयूल्ड बँकेत खाते उघडले आहे त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल.

९. विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न हे सन २०२३-२४ करीता २.५० लाखापेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासना मार्फत ज्या-ज्या वेळी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल त्यानूसार या योजनेसाठी पालकांची उत्पन्न वार्षिक मर्यादा त्या त्या प्रमाणे लागू राहील.

१०. विद्यार्थी स्थानिक नसावा. (ज्या महाविद्यालय/ शैक्षणिक संस्थेत विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे तो विद्यार्थी ते महाविद्यालय / शैक्षणिक संस्था ज्या महानगर पालीका/ नगर पालीका/ ग्रामपंचायत/ कटक मंडळे यांच्या हद्दीत आहेत त्या महानगर पालीका/ नगर पालीका/ ग्रामपंचायत/ कटक मंडळे येथील रहिवासी नसावा.

११. महानगरपालिकेच्या हद्दीपासून ०५ कि.मी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात/ शिक्षण संस्थेत शिकत असलेले विद्यार्थीसुध्दा या योजनेचा लाभ मिळविण्यास पात्र असतील.

१२. विद्यार्थी इ. ११ वी , १२ वी आणि त्यानंतरचे उच्च शिक्षण घेणारा असावा.

१३. ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास १० वी मध्ये किमान ५० टक्के असणे अनिवार्य आहे.

१४. १२ वी मध्ये विद्यार्थ्यास किमान ५० टक्के गुण असल्यावर या योजनेचा पुढे पदवी/ पदव्युत्तर शिक्षणकरीता लाभ घेता येईल.

१५. पदवी, पदवीका, दोन वर्षापेक्षा कमी नसणाऱ्या कोणत्याही मान्यताप्राप्त अभ्यासक्रमास सदर विद्यार्थ्यास पुढे लाभ घेण्याकरीता किमान ५० टक्के गुण किंवा त्याप्रमाणात ग्रेडेशन/ सीजीपीए असणे आवश्यक राहील..

१६. १२ वी नंतर पदविका, पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षापेक्षा कमी नसावा. तसेच पदवीनंतर पदव्युत्तर पदवी/ पदवीका अभ्यासक्रमाचा कालावधीची दोन वर्षापेक्षा कमी नसावा. (संबधित अभ्यासक्रम शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळविण्यासाठी अनुज्ञेय असावा.)

१७. विद्यार्थ्याची निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

१८. या योजनेमध्ये दिव्यांग (अनु. जाती व नवबौध्द घटकातील) विद्यार्थ्यांना ३ टक्के आरक्षण असेल. दिव्यांग (अनु. जाती व नवबौध्द घटकातील) विद्यार्थ्यासाठी गुणवत्तेची टक्केवारी ४० टक्के इतकी राहील व त्यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

१९. या योजनेसाठी खासबाब सवलत लागू राहणार नाही.

**संदर्भ परिपत्रक क्र. २ नूसार मुद्दा क्र. १२ नूसार खालीलप्रमाणे कार्यवाहीबाबत परिपत्रक प्राप्त झाले आहे.**

सन २०२४-२५ पासून नव्याने कार्यरत होत असलेले ऑनलाईन पोर्टल **https://hmas.mahait.org** या पोर्टलद्वारे शासकीय वसतिगृह नव्याने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने करीता एकत्रित तयार केले असलेने शासकीय वसतिगृहास ऑनलाईन अर्ज करणाऱ्या ज्या पात्र अनुसूचित व नवबौध्द प्रवर्गाच्या विद्यार्थ्याची गुणवत्ते अभावी निवड शासकीय वसतिगृहात झालेली नाही अशा विद्यार्थ्याचे अर्ज प्रणालीद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता ग्राहय धरले जाऊन नियमानूसार पुढील पडताळणी करीता संबधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगीनवर अग्रेषित केले जातील.

वसतिगृह प्रवेशाकरीता कोल्हापूर शहर येथील शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यांची माहिती खालीलप्रमाणे पुरविण्यात येत आहे.

| वसतिगृहाचे नांव | पत्ता | गृहपाल यांचे नांव | संपर्क क्र. |
|---|---|---|---|
| १. मागासवर्गिय **मुलींचे** शासकीय वसतिगृह, कोल्हापूर | साईनाथ कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर | श्रीमती सुषमा गडकरी | ९८२३१९२०२६ |
| २. १२५ वी जयंती **मुलींचे** शासकीय वसतिगृह, कोल्हापूर | मराठा कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर | श्रीमती सुषमा गडकरी | ९८२३१९२०२६ |
| ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर **मुलांचे** शासकीय वसतिगृह, कोल्हापूर | पाचगांव, भारती विद्यापीठ समोर, ता. करवीर, जि.कोल्हापूर | श्री. किरण पाटील | ९९२१९१८८९८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. गुणवंत **मुलांचे** शासकीय वसतिगृह क्र. २, कोल्हापूर | दसरा चौक, सिता कॉलनी, करवीर पंचायत समितीचा मागे, कोल्हापूर | श्री. मानसिंग जगताप | ८३०८३७९०९९ |

उपरोक्त विहीत केलेल्या कार्यपध्दतीनूसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीताची प्रवेश प्रक्रीया सन २०२४-२५ करीता **https://hmas.mahait.org** पोर्टलवर अर्ज भरणेबाबत आपले स्तरावरुन पात्र असणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे. **आपले शैक्षणिक संस्थेत शिकत असलेला विद्यार्थी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.** ऑनलाईन प्रणालीचे हे प्रथम वर्ष असलेने आपले स्तरावर काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास acswokopswadhar@gmail.com या ईमेलवर थेट संपर्क साधून त्रुटीचे निराकरण करुन घ्यावे.

**सोबत -** १. वसतिगृह प्रवेश वेळापत्रक.
२. संदर्भ क्र. १ शासन निर्णयाची प्रत

(सचिन साळे)
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे

**प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव रवाना.**

३. गृहपाल,मागासवर्गिय मुलींचे शासकीय वसतिगृह, कोल्हापूर
४. गृहपाल,१२५ वी जयंती मुलींचे शासकीय वसतिगृह, कोल्हापूर
५. गृहपाल,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, कोल्हापूर
६. गृहपाल,गुणवंत मुलांचे शासकीय वसतिगृह क्र. २, कोल्हापूर

## शासकीय वसतिगृहाचे सन २०२४-२५ मधील प्रवेशाचे वेळापत्रक

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा दिनांक | पहिली निवड यादी अंतिम करणे व प्रसिध्द करणे. | पहिल्या निवड यादी नुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनूसार निवड यादी प्रसिध्दी करणे. | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
|---|---|---|---|---|---|
| **बिगर व्यवसायिक अभ्यासक्रम** | | | | | |
| इ. १० वी व ११ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी | **३१.०७.२०२४ पर्यत** | **०५.०८.२०२४** | **१२.०८.२०२४ पर्यत** | **१५.०८.२०२४** | **२२.०८.२०२४ पर्यत** |
| बी.ए./ बी. कॉम./ बी.एस.सी. अश्या १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवीका / पदवी आणी एम. ए./ एम. कॉम./ एस. एस. सी. असे पदवी नंतरचे पदव्यूत्तर, पदवी, पदवीका इत्यादी अभ्यासक्रम | **३१.०७.२०२४ पर्यत** | **०५.०८.२०२४** | **१२.०८.२०२४ पर्यत** | **१५.०८.२०२४** | **२२.०८.२०२४ पर्यत** |
| **व्यवसायिक अभ्यासक्रम** | | | | | |
| व्यवसायिक अभ्यासक्रम | **३०.०८.२०२४ पर्यत** | **०४.०९.२०२४** | **१०.०९.२०२४ पर्यत** | **१३.०९.२०२४** | **१९.०९.२०२४ पर्यत** |

**टिप - प्रवेशाच्या शिल्लक राहिल्यास मुदत संपल्यानंतर अर्ज स्विकारता येतील व पुढील प्रत्येक आठवडयात एक याप्रमाणे दोन निवड यादी जाहिर करण्यात यावी.**

(सचिन साळे)
**सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण, कोल्हापूर**

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-1
दूरध्वनी क्र.20-26127569 ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/शावगृ प्रवेश/ व्यव.अभ्यासक्रम / पुणे, दिनांक: २३ .०९.२०२४
मुदतवाढ/२०२४-२५/का-५अ/ २८३८

# परिपत्रक

प्रति,
१. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय: सन २०२४-२५ या वर्षातील मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाच्या व्यवसायिक अभ्यासक्रमास मुदतवाढ देणेबाबतचे वेळापत्रक निर्गमित करणेबाबत

संदर्भ: १) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शानिशा व शावगृ/पुर्व तयारी/ २०२४-२५/१५२१, दिनांक १९.०४.२०२४.
२) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/सन २०२४-२५ प्रवेश प्रक्रीया/ २००२४-२५/का-५अ/१८७५, दिनांक ०५.०६.२०२४.
३) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. सकआ/शिक्षण/शावगृ/सन २०२४-२५ प्रवेश प्रक्रीया/ २०२४-२५/का-५अ/२१९१, दिनांक ०१.०७.२०२४.
४) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/सन २४-२५ प्रवेश प्रक्रीया/ वेळापत्रक-परिपत्रक/२०२४-२४/का-५अ/२२७४, दिनांक ०६.०७.२०२४.
५) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शावगृ/प्रवेश व स्वाधार/ऑनलाईन प्रणाली/२०२४-२५/का-५अ/२४९४, दिनांक ३१.०७.२०२४.
६) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सकआ/शिक्षण/शावगृ प्रवेश/ व्यव.अभ्यासक्रम/ मुदतवाढ/२०२४-२५/का-५अ/२७४२, दिनांक २७.०८.२०२४.
७) शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या सीईटी सेलच्या पोर्टलवरील वेळापत्रक.

शासकीय वसतिगृहाचे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियाबाबत आज्ञावली विकसनाचे (Software Development) काम प्रगती पथावर असून यामध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज ऑनलाईनरित्या स्विकृत करण्याबाबतचे मोड्यूल महाआयटी व्दारे दिनांक ३०.०७.२०२४ पासून कार्यरत झालेली आहे. त्यानुसार दिनांक ३१.०७.२०२४ पासून https://hmas.mahait.org या पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत. याबाबतच्या सूचना आयुक्तालयाचे संदर्भ परिपत्रक क्र.५ अन्वये सर्व



Scanned with OKEN Scanner

प्रादेशिक उपआयुक्त आणि सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे या परिपत्रकासोबत शासकीय वसतिगृहातील व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे वेळापत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. या परिपत्रकामध्ये खालील बाबीचे अनुपालन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

१. वसतिगृह असणाऱ्या शहरातील विविध शाळा/ कॉलेजच्या प्रवेश प्रक्रीयाचे वेळापत्रक लक्षात घ्यावे, त्यानुसार वसतिगृह प्रवेश वेळापत्रकामध्ये प्रादेशिक उपआयुक्त/ सहाय्यक आयुक्त यांना सुसंगत व अंशत: बदल करता येईल मात्र याचे कारण त्यांच्या आदेशात नमूद करणे आवश्यक राहील.
२. राज्यातील काही ठिकाणी जिल्ह्यातील तालुकास्तरावरील अथवा जिल्हा स्तरावर व्यावसायीक अभ्यासक्रमाचे महाविद्यालये कमी प्रमाणात कार्यरत असतील व त्यामधील सर्व प्रवेश प्रक्रीया देखील पुर्ण झाली असेल, अशा महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांकरीताची त्या ठिकाणी असलेल्या शासकीय वसतिगृहांची गुणवत्ता यादी संबंधीत सहाय्यक आयुक्त यांनी त्या त्या वेळी मान्यता देऊन प्रसिध्द करावी व अशा परिस्थितीत पुर्ण राज्याच्या प्रवेश प्रक्रीयेच्या गुणवत्ता यादी प्रसिध्द होणेकरीता थांबण्याची आवश्यकता नाही.

तथापी, शैक्षणिक संस्थांची सन २०२४-२५ या वर्षातील व्यवसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या सीईटी सेलच्या पोर्टलवरील वेळापत्रकाप्रमाणे दिनांक १२.०९.२०२४ रोजी पुर्ण होत आहे. याबाबत विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश अर्ज करण्यास पुरेसा अवधी मिळावा म्हणून शासकीय वसतिगृहातील व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशास मुदतवाढ देण्यात येत आहे.

याअनुषंगाने या परिपत्रकासोबत शासकीय वसतिगृहातील व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशास मुदतवाढ देणेबाबतचे वेळापत्रक निर्गमित करण्यात येत आहे. त्यानुसार संबंधीत सर्वांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

13-09-24

सोबत: व्यवसायिक अभ्यासक्रमाचे
वसतिगृह प्रवेश मुदतवाढ वेळापत्रक

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : माहितीस्तव.
२. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई ३२.

प्रत: कार्यवाहीस्तव.
प्रकल्प अधिकारी, महाआयटी कॉर्पोरेशन लिमिटेड, एपीजे हाऊस, चर्चगेट, मुंबई १.





CamScanner

Scanned with OKEN Scanner

# शासकीय वसतिगृहाचे सन २०२४-२५ मधील व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या दुसऱ्यांदा मुदतवाढीचे वेळापत्रक

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा दिनांक | पहिली निवड यादी अंतिम करणे व प्रसिद्ध करणे | पहिल्या निवड यादी नुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची गुणवंतेनुसार निवड यादी प्रसिद्ध करणे. | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांनां प्रवेश देणे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| व्यावसायीक अभ्यासक्रम | २०.०९.२०२४ पर्यंत | २४.०९.२०२४ | ३०.०९.२०२४ पर्यंत | ०३.१०.२०२४ | ०८.१०.२०२४ पर्यंत |

टिप: प्रवेशाच्या जागा शिल्लक राहील्यास मुदत संपल्यानंतर अर्ज स्विकारता येतील व पुढील प्रत्येक आठवडयात एक याप्रमाणे दोन निवड यादी जाहिर करण्यात यावी.

13-09-24

(ओमप्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with OKEN Scanner